दुरध्वनी क्र.- ☎(0721)2551001
फॅक्स क्र. - (0721)2551010
ई मेल - cp.amravati@mahapolice.gov.in


**पोलीस आयुक्त कार्यालय, अमरावती शहर**
**मालटेकडी रोड, कॅम्प-अमरावती**

क्रमांक : पोआअश/पशा-२/कैदी आहार भत्ता/२०२४ 316 अमरावती शहर दिनांक : /०१/२०२४

09 JAN 2024

**विषय :-** पोलीस आयुक्त, अमरावती शहर यांचे आस्थापनेवरील पोलीस स्टेशन राजापेठ व पोलीस स्टेशन सिटी कोतवाली येथील पोलीस कोठडीतील कैदयांना आहार भत्ता पुरविणेबाबत.

---ooo---

उपरोक्त विषयान्वये कळविण्यात येते की, पोलीस आयुक्त, अमरावती शहर यांचे आस्थापनेवरील पोलीस स्टेशन राजापेठ व पोलीस स्टेशन सिटी कोतवाली येथील पोलीस कोठडीतील कैदयांना सन २०२४-२०२५ या वर्षाकरीता आहार भत्ता पुरविणेबाबत अधिकृत भोजन पुरवठाधारक यांचेकडून दरपत्रके मागविण्याबाबतचे अटी व शर्तीचे सुचनापत्र, विहीत नमुन्यातील प्रपत्र यासोबत जोडून पाठविण्यात येत आहे.

सदरचे सुचनापत्र पोलीस आयुक्त, अमरावती शहर या कार्यालयाचे संकेतस्थळ www.amravaticitypolice.gov.in या वेबसाईट वरील Flash या Tab वर प्रसिध्द करण्यात यावे.

( सागर पाटील )
पोलीस उपायुक्त (मुख्या.)
पोलीस आयुक्त कार्यालय, अमरावती शहर

प्रति,

प्रभारी पोलीस अधिकारी, सायबर पोलीस ठाणे, पो.आ. कार्यालय, अमरावती शहर

2/- सदरचे सुचनापत्र आपले कार्यालयाचे संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावे.

<u>पोलीस आयुक्तालय अमरावती शहर,अमरावती</u>

<u>निविदा सुचना</u>

पोलीस आयुक्त अमरावती शहर या आस्थापनेवरील पो.स्टे कोतवाली व पो.स्टे.राजापेठ येथील पोलीस कोठडीमधील कैदयांना सन २०२४-२०२५ या वित्तीय वर्षा करिता आहार भत्ता पुरवठा करणा-या कडुन निविदा मागविण्यात येत आहे. प्रति व्यक्ती दोन वेळचे जेवण (भोजन) पुरविणेकरीता अधिकृत पुरवठा धारकाकडुन दरपत्रके मागविण्यात येत आहे. करीता ज्या पुरवठा धारकांना खालील अटी व शर्तीचे अधिन राहुन कैदी खुराक भत्ता पुरविणे बाबतचे स्पर्धा प्रक्रियेत भाग घ्यावयाचा असल्यास त्यांनी दोन लिफाफा पध्दतीने दरपत्रके पोलीस आयुक्त कार्यालय अमरावती शहर येथे आपले सिलबंद दरपत्रके दिनांक १६/०१/२०२४ पावेतो सादर करावे.

दरपत्रके सादर करणेकरीता पत्ता-

पोलीस आयुक्त अमरावती, शहर कॅम्प रोड

मालटेकडी जवळ अमरावती

दुरध्वनी क्र.०७२१-२५५१०००

**(सागर पाटील)**

पोलीस उपायुक्त (मुख्यालय)

पोलीस आयुक्त,कार्यालय, अमरावती शहर

**पोलीस आयुक्त कार्यालय अमरावती शहर**

**निविदा सुचना.**

09 JAN 2024

क्रमांकः- पोआअ/पशा-२/कैदी खुराक भत्त्याबाबत नि.सु/३१७ /२०२४ अमरावती, दिनांक :- ०९/०१/२०२४

---

पोलीस आयुक्त अमरावती शहर या आस्थापनेवरील पोलीस कोठडीतील कैदयांना निविदेतील दर स्विकृत केल्याच्या दिनांकापासून एक वर्षाकरीता पोस्टे कोतवाली व पोस्टे राजापेठ येथील पोलीस कोठडीतील कैदयांना प्रतिव्यक्ती दोन वेळचे जेवण पुरविणेकरीता नोंदणीकृत भोजन पुरवठा धारकाकडुन दोन लिफाफा पध्दतीने दरपत्रके मागविण्यात येत आहे.

पोलीस कोठडीतील कैद्याचे आहार भत्त्याचे दर हा शासन निर्णय क्रमांक -एमपीआय -२०१४/प्र.क्र.७४/पोल-११ दिनांक १२/१०/२०१८ अन्वये शासनाने महानगरपालीका क्षेत्रातील पोलीस कोठडीतील कैद्यासाठी आहार भत्याचा प्रतिदिन प्रतिडोई रु. १००/- प्रमाणे दर निश्चित केला आहे.

भोजन पुरवठा धारकाकडुन दोन लिफाफा पध्दतीने मागविण्यात येणारे दरपत्रक सादर करणा-या पुरवठा धारकाने खालीलप्रमाणे अटी व शर्तीचे अधिन राहुन दरपत्रके सादर करावयांचे आहेत.

**सर्वसाधारण अटी व शर्ती**

1. पोलीस कोठडीतील कैदयांना दोन वेळेच्या जेवणात खालील नमुद तक्यात दर्शविण्यात आल्या प्रमाणे भोजन पुरवठा करावा लागेल.

| अ.क्र. | विवरण | वर्णन | माप |
|---|---|---|---|
| ०१ | प्रति व्यक्ती एका वेळसचे भोजन | पोळी<br>भाजी<br>तुरीची दाळ<br>मटन ( आठवडयातुन एकदा) | ३७५ ग्रॅम<br>१०० ग्रॅम<br>७५ ग्रॅम<br>१५० ग्रॅम |
| ०२ | आजारी कैदी | दुध | १ लिटर |

2. तांत्रिक निविदेतील अत्याआवश्यक कागदपत्राची पुर्तता नसलेल्या व अपात्र ठरलेले निविदाकाराच्या व्यापारी दराच्या लिफाफयातील वस्तुच्या दराचे वाचन केले जाणार नाही अथवा लिफाफा उघडण्यात येणार नाही व याबाबत कुठलाही पत्रव्यवहार ग्राहय धरला जाणार नाही.

3. भोजन पुरवठयासंबधी स्विकृत निविदाकारास नियमानुसार करारनामा करून दयावा लागेल. याचा पुर्ण खर्च पुरवठादाराने करावायाचा आहे.

4. निविदेतील दर स्विकृत केल्याच्या दिनांकापासून एक वर्षापर्यंत वैध राहतील. निविदा स्विकृत झाल्यानंतर विहीत नमून्यात करारनामा करून दयावा लागेल

5. पुरवठा आदेश दिल्यापासून पुरवठा सुरू करावा लागेल तसेच संबधीत पुरवठादारास आदेश प्राप्त झाल्यानंतर भोजनाचा पुरवठा पूर्ण करावा लागेल. मुदतीत पुरवठा सुरू न केल्यास किंवा पुरवठयाची असमर्थता दर्शविल्यास पुरवठयाचा करार रद्य करण्यात येईल. पुरवठा आदेशाप्रमाणे पुरवठा करण्यासाठी कोणत्याही प्रकारे अग्रिम रक्कम मिळणार नाही.

6. अनुदान अभावी देयकाचे प्रदानास विलंब झाल्यास त्यावर कोणत्याही प्रकारचे व्याज अनुज्ञेय राहणार नाही.

7. निविदा दर केवळ व्यापारी लिफाफायातील विहीत नमुन्यात सादर करणे बंधनकारक असुन निविदेत अन्यत्र दर प्रदर्शित केल्यास अशी निविदा अपात्र ठरू शकेल.

8. निविदाकाराने सादर केलेली कागदपत्रे बनावट / चुकीची आढळल्यास अशा निविदाकाराची निविदा विचारात घेतली जाणार नाही व त्याच्या विरूध्द योग्य ती कायदेशिर कारवाई करण्यात येईल. अशा निविदाकारास भविष्यात पोलीस आयुक्तालयाचे कोणत्याही निविदेत भाग घेता येणार नाही.

9. निविदेतील सर्व कागदपत्रे सही शिक्यानिशी स्वसांक्षांकिंत (Self Attested) करणे आवश्यक आहे.

10. पुरवठादाराच्या अपु-या पुरवठयामुळे व मागणी केलेल्या भोजनाची निकड लक्षात घेता किंवा पुरवठा वेळेत न केल्यास, जादा दराने इतर पुरवठाधारक यांचेकडुन भोजन पुरवठा पुरवावा लागेल. तर, या कार्यालयास झालेले नुकसान पुरवठाधाराकडून वसूल केले जाईल. या अनुषंगाने करार रद्य करणे किंवा कायदेशिर कार्यवाही करण्याचा अधिकार पोलीस आयुक्त, अमरावती शहर यांना राहील व याबाबत पोलीस आयुक्त, अमरावती शहर यांचा निर्णय अंतिम राहील.

11. निविदेतील दर स्वीकृत केल्याच्या दिनांकापासून 365 दिवसा करीता (एक वर्षाकरिता) वैध राहतील. याच कालावधीत मंजुर दराने पुरवठा करण्याचे बंधन निविदाकारांवर राहील.

12. सर्व प्रकारची प्रदाने Cash Management Project (CMP) व्दारे करण्यात येईल, त्याकरिता आवश्यक सर्व दस्ताऐवज पुरवठाधारक यांना सादर करणे बंधनकारक राहील.

13. कोणतेही कारण न देता एखादी किंवा सर्व दरपत्रके पूर्णत: अथवा अंशत: मंजूर अगर नामंजूर करण्याचा अधिकार खरेदी समितीस राहील.

14.उपद्रवकारक तक्रारीबाबत शासन निर्णय दिनांक ०१/१२/२०१६ मधील परिशिष्ट ५.८.३ नुसार कार्यवाही करण्यात येईल.

15. कोणतेही कारण न देता एक अथवा सर्व निविदा नाकारण्याचे अधिकार पोलीस आयुक्त, अमरावती यांनी स्वत:कडे राखून ठेवले आहे.

**(सागर पाटील)**
पोलीस उपायुक्त (मुख्यालय)
पोलीस आयुक्त,कार्यालय, अमरावती शहर

उपरोक्त अटी व शर्ती मी / आम्ही काळजीपूर्वक वाचल्या असून त्या मला / आम्हाला मान्य असून बंधनकारक राहतील. करीता स्वाक्षरी केली आहे.

**ठिकाण :-**

**दिनांक :-**

**निविदाकाराची स्वाक्षरी / नाव शिक्का**

दरपत्रके हे दोन लिफाफा पध्दतीने मागविण्यात येत असुन पहिला लिफाफा क्र.१ तांत्रीक लिफाफा (आवश्यक कागदपत्र) दुसरा लिफाफा क्र.२ व्यापारी लिफाफा (दरपत्रक) याप्रमाणे पुरवठा धारकांनी दरपत्रके सादर करावयांची आहे.

**तांत्रीक लिफाफामध्ये खालील कागदपत्रे सादर करणे अनिवार्य आहे.**

१. पुरवठा धारकाने स्वत: आरोग्य विषयक सक्षम असले बाबतचे आरोग्य अधिकारी महानगरपालीका/शासकीय रुग्णालय/प्राथमिक आरोग्य केंद्र यांचे प्रमाणपत्र /दाखला जोडावा.

२. अन्न व औषध प्रसाधन, खादय विभाग यांचा परवाना भोजन ठेका चालविण्यांचे तसेच अन्न व औषध विभागाचे महाराष्ट्र अन्न भेसळ प्रतिबंधक कायद्या अंतर्गत मिळालेला अदयावत परवाना असणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे उपरोक्त प्रमाणपत्र भोजन ठेका चालु असे पर्यत परवाना अदयावत असणे व तो वेळोवेळी नुतणी करण करणे आवश्यक राहील.

३. सक्षम प्राधिका-यांचे व्यवसाय नोंदणी प्रमाणपत्र (Shop Act)

४. जी.एस.टी.नोंदणी प्रमाणपत्र

५. प्रोफेशनल टॅक्स नोंदणी प्रमाणपत्र तसेच .प्रोफेशनल टॅक्सचा सन मार्च २०२२ पर्यतचा भरणा केल्यांची पावती

६. पॅन कार्डाची प्रत व मागील तीन वर्षाचे (सन-२०१९-२०२०, २०२०-२०२१,२०२१-२०२२ ) आयकर भरणा केल्याचे विवरणपत्र

७. कामाचा अनुभव

**वरीलप्रमाणे कैदी खुराक भोजन पुरवठयांचे दरपत्रक हे या कार्यालयाचे निविदा www. amravaticitypolice.gov.in संकेत स्थळावर प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासुन सात दिवसाच्या आत खालील पत्त्यावर सादर करावे.**

**दरपत्रक सादर करावयाचा पत्ता**

**पोलीस आयुक्त कार्यालय अमरावती शहर**
**मालटेकडी जवळ कॅम्प रोड अमरावती**
**पिन कोड - ४४४६०२**
**फोन -: ०७२१- २५५१०००**

**(सागर पाटील)**
पोलीस उपायुक्त (मुख्यालय)
पोलीस आयुक्त,कार्यालय, अमरावती शहर

# निविदाकाराची माहीती

| | | |
|---|---|---|
| निविदाधारकाचे संपूर्ण नांव | | |
| निविदाधारकाचा संपूर्ण पत्ता | | |
| दुरध्वनी क्रमांक | कार्यालय | :- |
| | कंपनी | :- |
| | मोबाईल क्रमांक | :- |
| ई मेल आय डी | | |
| अन्न व औषध प्रशासनाचे प्रमाणपत्र | | |
| सी.एस.टी. रजिस्ट्रेशन नंबर | | |
| जी.एस.टी. रजिस्ट्रेशन नंबर | | |
| पॅन नंबर | | |
| व्यवसायकर नोंदणी प्रमाणपत्र नंबर | | |
| संस्थेचे नोंदणी प्रमाणपत्र | | |
| नमुना सादर | होय / नाही | |
| उत्पादकाचे प्राधिकार पत्र | | |
| भागीदारी व्यवसाय असल्यास<br>Partnership Deed ची प्रत सोबत जोडावी | | |

निविदाकाराची स्वाक्षरी / नांव व शिक्का

पोलीस आयुक्त कार्यालय
अमरावती शहर
दरपत्रक व दराबाबत हमीपत्र

| अ.क्र. | तपशिल | प्रमाण | निविदाधारकाने भरावयाचे दर | दर अक्षरी रुपये |
|---|---|---|---|---|
| १. | पोलीस स्टेशन राजापेठ व पोलीस स्टेशन सिटी कोतवाली येथील कैदयांना भोजन पुरविणे | पोलीस कोठडीतील कैदयांना दोन वेळेच्या भोजन पुरविण्याचे प्रमाण<br><br>प्रति व्यक्ती एका वेळेसचे भोजन<br>पोळी - ३७५ ग्रॅम<br>भाजी - १०० ग्रॅम<br>तुरीची दाळ - ७५ग्रॅम<br>मटन आठवडयातुन एकदा - १५० ग्रॅम<br>आजारी कैदी दुध - १ लिटर | | |

मी/आम्ही असे जाहिर करतो की,मी/आम्ही हे दरपत्रक सादर करण्यापुर्वी दरपत्रकामध्ये भरलेले दर ज्यावर आधारलेले आहेत अशा आहाराचे स्वरुप स्थानिक बाजारभाव,मनुष्यबळ वाहनावळ विभागाने मोफत पुरविलेल्या बाबी या परीस्थितीचा पुर्ण विचार करुन काळजीपुर्वक अभ्यास करुन सर्व बाबी समजुन घेऊन दर नमुद केलेले आहेत.हे दिलेले दर हे सर्व करासहीत आहेत. ते निविदेच्या पुर्ण कालावधीकरीता कायम राहतील, याची मला जाणीव आहे.

निविदा मधील अटी तथा शर्ती उदयोग उर्जा व कामगार विभागाचा शासन निर्णय दिनांक ०१/१२/२०१६ आणि गृह विभागाचा शासन निर्णय दिनांक १२/१०/२०१८ या शासन निर्णयातील सर्व अटी व शर्ती मी/आम्ही पुर्णपणे वाचल्या असुन त्या मला /आम्हाला मान्य आहेत. याबाबत आमची कोणतीही तक्रार नसुन आम्हाला सर्व बाबी समजलेल्या आहेत व कोणत्याही नियंमाच्या अटी व शर्तीचा भंग आम्ही करणार नाही, अशी हमी मी/आम्ही देत आहोत.

**ठिकाण:-**

**दिनांक:-**

निविदाधारकाची सही
नाव व पत्ता

## प्रमाणपत्र - अ

प्रमाणित करण्यात येते की, मी -----------------------------------तालुका ------जिल्हा -----------विभागातील पोलीस आयुक्त कार्यालय अमरावती शहर येथील पोलीस कोठडीतील कैदयांना भोजन / आहार पुरविणे बाबत निविदेतील सर्व अटी व शर्ती मी वाचल्या असुन त्या मला मान्य आहेत. निविदेत सादर केलेली सर्व कागदपत्रे सत्य व खरी असुन त्यात कोणतेही फेर फार केलेली नाही. मला अथवा माझ्या संस्थेत कोणत्याही शासकीय, निम शासकीय शासन अंगीकृत उपक्रमाने काळया यादीत समाविष्ट केलेले नाही वा अशी कारवाई प्रगतीत / प्रस्तावित नाही. बालमजुरी, कामगार कायदे, लैगिंक पिळवणुक, मानवधिकार इत्यादी विषयी आवश्यक धोरणाचेही आमच्याकडून पालन होते.

वर नमुद सर्व माहिती मान्य असुन यात चुक आढळल्यास मी कारवाईस पात्र असेल याची मला पुर्ण जाणीव आहे.

ठिकाण:-

दिनांक:-

**निविदाकाराची स्वाक्षरी/नांव व तपशिल**

## प्रमाणपत्र - ब

मी ---------------------------------------------------------------------- या वरुन असे प्रतिज्ञापत्र देतो की,या अर्जात नमुद करण्यात आलेल्या निवीदा फॉर्म "**ब** "मधील माहिती अटी व शर्ती वैयक्तिक माहिती मी पुर्णपणे वाचुन समजुन घेतली असुन ती बरोबर असुन त्या मला मान्य आहेत. तसेच निविदेसोबत दिलेली माहिती चौकशी अंती खोटी असल्याचे आढळुन आल्यास माझ्यावर शासनाच्या नियमानुसार उचित कारवाई करण्यात येईल, याची मला जाणीव आहे. काही अपरिहार्य कारणामुळे देयके मिळण्यास विलंब झाल्यास आम्ही भोजनपुरवठा खंडीत करणार नाही हे प्रतिज्ञेवर सादर करीत आहे.

**ठिकाण:-**

**दिनांक :-**

**(निविदाधारकाची स्वाक्षरी नाव व तपशिल)**